# कथापंचक

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय का.की.
दा. क्र. ४८७



BVBK-0400471

# कथांजली

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 879 दिनांक .......
विषय ....... क्र. .......

सौ. रजनी दाते

सौ. वैशाली साने

BVBK-0400471

व्ही. आर. प्रकाशन,.

प्रकाशक :
व्ही. आर्. प्रकाशन,
१०५८ शुक्रवार पेठ,
टिळक रोड,
पुणे ४११००२

•

सर्व अधिकार प्रकाशकाचे स्वाधीन

किंमत २ रुपये

•

मुद्रक :
सचिन मुद्रणालय,
२०३ सदाशिव पेठ,
पुणे ३०

•

१० मे १९७८ (अक्षय्य तृतीया)

# चतुरची चतुराई

फार वर्षापूर्वी ' सावली ' नावाच्या गावात एक गरीब शेतकरी रहात होता. त्याला विरूपा नावाची मुलगी होती. विरूपा नावाप्रमाणेच कुरूप होती. काळा रंग, पुढे आलेले दाताचे फालके आणि बेडकासारखे बटबटीत डोळे, यामुळे ती फारच विचित्र दिसे. विरूपा लहान असतानाच तिची आई देवाघरी गेली होती. विचित्र रूप, जोडीला चिडखोर, दांडगट स्वभाव यामुळे विरूपा कोणाला हवीशी वाटत नसे. जोडीच्या मित्र-मैत्रीणी तर तिची टिंगलच करीत असत. विरूपा चिडून त्यांच्या अंगावर धावून जाई, त्यांना ओचकारे, ओरबाडे आणि पळून जाई. तिच्या स्वभावात विचित्र क्रूरतेची झाक होती. समोरचा माणूस तिचे चिडलेले रूप बघून घाबरून जात असे सान्या गावाच्या तक्रारी विरूपाच्या वडिलांकडे येत. विरूपाचे वडील विरूपाला खरपूस मार देत. मारामुळे विरूपा सुधारायच्या ऐवजी आणखीनच त्रास देवू लागली. विरूपाच्या या त्रासाला तिचे वडीलही कंटाळून गेले. विरूपाला सुधारण्याचा एकही उपाय त्यांच्याकडे नव्हता. शेवटी एक दिवस झोपलेल्या विरूपाला, ते वन-वन जंगलात सोडून आले.

सकाळी विरूपा जागी झाली. उठून बघते तो सारे वातावरण अनोळखी. नजर टाकावी तिकडे झाडेच झाडे. विरूपा

पार भेदरून गेली. घाबरून रडू लागली. रडून रडून तिने धिंगाणा घातला. नेहमीप्रमाणे थयथयाट केला. पण कोणीही तिची दखल घेतली नाही. बाबा ऽ बाबा करत, जंगलातून वाट शोधण्यासाठी विरूपा भिरभिर हिंडली. पण त्या झाडांच्या चक्रव्यूहात तिची वाट केव्हाच हरवून गेली होती. झाडं ! झाडं ! आणि झाडं ! त्या झाडीतून येणारे प्राण्यांच्या ओरडण्याचे आवाज ऐकू येऊ लागल्यावर मात्र विरूपा सावध झाली. रडणं सोडून देऊन ती स्वतःचे संरक्षण करण्याकडे लक्ष देवू लागली. हळूहळू तिथल्या वातावरणाला सरावली. छोट्या छोट्या प्राण्यांच्यात मिसळण्याइतपत तिला त्यांची सवय झाली. आणि गंमत म्हणजे जंगलातील साऱ्या प्राण्यांनी या नव्या पाहुणीला आपल्यात सामावून घेतले.

प्राण्यांनी जरी तिला सामावून घेतले तरी विरूपाचा मूळचा स्वभाव बदलला नव्हता. फक्त लहान वयामुळे ती प्राण्यांशी वैर धरू शकत नव्हती. प्राण्यांच्या संगतीत राहिल्यामुळे तिचा मूळचा क्रूर स्वभाव अधिकाधिकच क्रूर बनत होता. माणसाची हुशारी आणि प्राण्यांची क्रूरता तिच्यात एकवटू लागली. माणसांबद्दलचा द्वेष तर तिच्या मनात पक्के घर करून होता. जंगली प्राण्यांचे दात, टोकदार शिंगं, तीक्ष्ण नखे यांचा उपयोग ती शस्त्र बनवण्यासाठी करू लागली. प्राण्यांनी आपल्यात सामावून घेतलेली विरूपा हळूहळू आपले खरे स्वरूप प्रकट करू लागली. आणि काही दिवसांत विरूपा जंगलची राणी झाली.

जंगलातील प्राण्यांवर विरूपाने विजय मिळविला असला तरी तिचे सारे लक्ष माणसांवर होते. फक्त आपल्या गावातल्याच नव्हे तर साऱ्या माणसाबद्दलच चिडलेली विरूपा

माणसाच्या वस्तीत जायला धजावत नव्हती. ती कितीही शक्तीवान असली, क्रूर, पराक्रमी असली तरी सर्व माणसे एकत्र आल्यावर तिचे काहीच चालणार नव्हते एवढे ती जाणून होती. माणसे नष्ट करण्याचा कोणता तरी दैवी उपाय ती शोधत होती. पण तो उपाय तर सापडत नव्हता. आता सारा संताप विरूपा जंगलातील प्राण्यांवर काढू लागली. आपल्या-जवळील शस्त्रांच्या सहाय्याने समोर प्राण्यांच्या चिंधड्या उडवू लागली. पक्षांची घरटी असलेली झाडे ताडताड तोडू लागली. विरूपाच्या या तांडवनृत्यापुढे प्राणीही हार गेले. त्यांनी दुसऱ्या जंगलाची वाट धरली. गट्टी करणारे प्राणी गुजगोष्टी करणारे पक्षी निघून गेल्यावर मात्र विरूपाला एकटेपणाने घेरले.

एकटेपणामुळे विरूपाच्या पूर्वस्मृती जागृत झाल्या. आपल्या आसपासची मुलं, घर एकेक तिला आठवू लागले. सर्वात अधिक आठवणीत होते वडील. त्यांचा दिनक्रम, त्यांचे कपडे, ते करीत असलेली शंकराची पूजा............

विरूपाचा विचार अडखळला. आपणही शंकराची भक्ती केली तर ? शंकराची तपःश्चर्या करून वर मिळवू.

दुसरेच दिवशी विरूपा तपश्चर्येला बसली. दिवसाचे दिवस शंकराचा जप करण्यात जाऊ लागला. जंगलात शांतता झाली. प्राणी पक्षी परतू लागले. काही वर्षे शांततेत गेली आणि एक दिवस विरूपाच्या तपश्चर्येचे सार्थक झाले. तिला शंकर प्रसन्न झाले. अनेक वर्षे तपश्चर्येत घालवूनही विरूपा बदलली नव्हती. तिला माणसाचे जीवन बरबाद करायचे होते, खरे तर साऱ्या मनुष्य जातीचा तिला निःपात करायचा होता. शंकरा-कडून तिने एकच एक वर मागून घेतला.

“ मी दिसताक्षणी प्रत्येक माणूस तत्काळ मरून पडेल.” शंकरांना ‘ तथास्तु ’ म्हणणे भागच होते. ‘ तथास्तु ’ म्हणून ते अदृश्य झाले.

विरूपाच्या आनंदाला आता पारावर उरला नाही. सबंध जंगल जणू तिच्या नाचगाण्याने हादरून गेले. आज कित्येक दिवसांनी विरुपाला शांत झोप लागली. स्वप्नातही विरुपाला, आपण दिसताच मरून पडलेली माणसे दिसू लागली.

सकाळ होताच विरुपाने आपला मोर्चा जंगलाजवळच्या खेडयाकडे वळवला. विरुपाची दृष्टी एखाद्या माणसावर जाताच तो तत्काळ मरून पडे. विरुपाही, मिळालेल्या वराची प्रचिती बघून अवाक झाली. साऱ्या खेडयात एक फेरफटका मारून विरुपा जंगलाकडे परत फिरली. खेडयातील लोक तर ह्या अघटित घटनेने सुन्न झाले.

विरुपाला या आसुरी आनंदाची आता चटक लागली. रोज सकाळ, संध्याकाळ विरुपा एकेका गावाला भेट देवू लागली. तिला ‘ माणसांनी ’ जीवनातून उठवले त्या माणूस जातीला आता जीवनातून उठवणे खरोखरीच तिच्या हातचा मळ होता.

विरुपा आता साऱ्या भारतात माहिती झाली. साऱ्यांनी विरुपाचा धसका घेतला. तिचे नाव घेतल्याबरोबर मुले गुपचुप झोपी जाऊ लागली. सर्वांपुढे विरुपाला कसे ठार करावे हा मोठा महान प्रश्न पडला. विरुपाशी युद्ध करावे तर तिच्यासमोर कोणी जिवंतच राहू शकत नव्हते. झोपेत तिला काही करावे तर विरुपाचे वास्तव्य होते दाट जंगलात.

विरुपाला मारण्यासाठी सगळीकडे मोठमोठी बक्षिसे

लावली गेली. सारे शूरवीर, पहेलवान गुपचूप होते. तिथे शूरत्वाचा, पराक्रमाचा कशाचाच उपयोग नव्हता. शक्ती जेव्हा कमी पडते तेव्हा युक्ती कामास येते. बक्षिसांच्या लोभाने अनेक जण पुढे आले. त्यांच्या युक्त्या त्यांच्याच अंगाशी आल्या. बिचारे जीव गमावून बसले.

साखरी गावात चतुर नावाचा माणूस होता. गमत्या माणूस म्हणून साऱ्या गावात तो प्रिय होता. तो विरुपाचे नाव ऐकून होता. विरुपाला कसे मारावे याचा तोही विचार करीत होता. एक दिवस साऱ्या गावाला त्याने सांगितले की आपण विरुपाला मारणार आणि सारी बक्षिसे मिळवणार. सर्वांना चतुरच्या इतर गंमतींसारखी हीही एक गंमतच वाटली. पण तो जर खरंच काही प्रयत्न करणार असला तर त्याला मदत करण्यासाठी सर्वजण तयार झाले.

विरुपा दिसताच समोरचा माणूस मरून पडतो ही गोष्ट सर्वश्रुतच होती. त्यावरून चतुरला एक कल्पना सुचली होती. त्याने सर्वांना सांगितले,–

"आपण सर्वांकडून पैसे गोळा करून एक भलामोठा आरसा तयार करू या. हा आरसा जंगलाच्या एका बाजूला उभा करू. विरुपा आरसा ठेवलेल्या जंगलाच्या बाजूला आली की तिचे प्रतिबिंब आरशात पडेल. त्या प्रतिबिंबावर तिची दृष्टी गेली की ते प्रतिबिंब म्हणजेच विरुपा धाडकन जमिनीवर पडेल, मरून जाईल. तिचाच वर तिला शाप ठरेल."

चतुरच्या या युक्तीत सर्वांना बरेच तथ्य वाटू लागले. भराभर पैसे जमा झाले. एक भला मोठा आरसा तयार झाला.

विरुपा दिवसभर गावोगावी भेटी देत हिंडे पण रात्री मात्र 'वन-वन'मध्ये परत येई. सकाळी सूर्य चांगला वर येईपर्यंत बाहेर पडत नसे. विरुपाची ही सवय सर्वांना माहीत होती, पण विरुपा जंगलाच्या कोणत्याही बाजूने बाहेर पडत असे. त्यामुळे आरसा जंगलाच्या कोणत्या बाजूला उभा करायचा हा प्रश्नच होता. चतुरने तोही प्रश्न सोडवला. आरशाच्या मागे आरसा धरण्यासाठी माणसे बसवावी लागणार होतीच. त्या माणसांनी सकाळी विरुपाला खूप जोरजोरात हाका मारव्यात. माणसांचा आवाज ऐकताच विरुपा त्याच बाजूला धावत येईल आणि आरशात प्रतिबिंब बघून........

चतुरच्या चतुराईची सर्वांनी वाखाणणी केली. सगळ्यांच्या अंगात विरुपाच्या मरणाच्या कल्पनेने उत्साह संचारला. निवडक माणसे घेऊन एका रात्री चतुर जंगलाच्या सीमेवर आरसा घेऊन आला. सारीजण येणाऱ्या सकाळची अत्यंत उत्सुकतेने वाट बघत होती. खेड्यातील लोकांनी तर उत्सवाची तयारी केली.

नेहमीप्रमाणे आकाश-अंगणात सूर्यनारायणाने प्रवेश केला. उगवत्या सूर्याला नमस्कार करून सर्वजण विरुपाच्या नावाने जल्लोष करू लागले. विरुपा आपले स्वतःचे नाव कित्येक वर्षांनी ऐकत होती नावच काय पण आपल्याखेरीज माणसांचा आवाज ऐकण्याचीही तिला सवय नव्हती. दणदाण पाय आपटत ती आवाजाच्या रोखाने झाडीतून येऊ लागली. विरुपाच्या पावलांचा आवाज जवळ येऊ लागल्यावर आरशाच्या मागे बसलेल्या लोकांची पाचावर धारण बसली. ते एकमेकांना डोळ्यांनीच धीर देऊ लागले. थोड्या वेळात विरुपा आरशा-समोर येऊन उभी राहिली आणि समोर येताच काही क्षणातच

धाडकन जमिनीवर कोसळली. आरशाच्या मागे बसलेला प्रत्येकजण आपण जीवंत असल्याची खात्री करून घेऊ लागला. आरसाही धाडकन् खाली पडला. विरुपा मेलेली पाहून एकच जल्लोष झाला. चतुरला सर्वांनी खांद्यावर उचलून घेतले व सर्वजण नाचत नाचत जवळच्याच खेड्यात गेलो. सगळीकडे जणू दिवाळीच साजरी झाली. चतुरचे नाव सर्वतोमुखी झाले. त्याच्यावर बक्षिसांची खैरात झाली.

वन-बन आता पूर्वीप्रमाणेच प्राणी-पक्षांनी गजबजून गेले. सारी मनुष्यजात निर्भयपणे जगू लागली. विरुपा लहानांच्या कथेतील ‘ दुष्ट राक्षसीण ’ बनली.

# जादूची होडी

त्यावेळी चंद्रपुरचा राजा चंद्रसेन याचं नाव सर्व भारतात प्रसिद्ध झालं होतं. चंद्रसेन हा प्रजेला पित्याप्रमाणेच वाटत असे. त्याच्या राज्यात कोणी उपाशी रहात नसे. दुःखी माता, विधवा, वृद्ध यांची तो स्वतः जातीने विचारपूस करीत असे. या राजाला पुत्र नव्हता. फक्त पद्मावती नावाची कन्या होती. पण पुत्र नाही याचं दुःख न करता त्यानं पद्मावतीलाच सर्व प्रकारचं शिक्षण दिलं होतं. रस्त्यानं पद्मावती घोडदौड करू लागली की कौतुकानं लोक दुतर्फा उभे रहात असत.

एकूण चंद्रसेनाच्या राज्यात सर्वत्र आनंदीआनंद होता. एक दिवस चंद्रसेन, प्रधान व इतर निवडक सरदारांसह शिकारीला गेला होता. मध्यान्ह झाली तरी त्या दिवशी शिकार मिळण्याचे लक्षण काही दिसेना. तळ्याकाठी न्याहारी करायला म्हणून सर्वजण परतले. इतक्यात राजाला दूरवर एक ध्वनी ऐकू आला. 'आत्ता येतो' म्हणून घोड्याचा लगाम खेचून राजा एकटाच त्या रोखाने निघाला. जेथून ध्वनी आला होता तेथे राजा पोचला. मात्र त्याला जनावर तर दिसले नाहीच पण एकदम दृष्टी नाहीशी होऊन काहीच दिसेनासे झाले. काय करावे हेच त्याला सुचेना. पण त्याचा घोडा हुशार होता. राजा काहीच इशारा करीत नाही हे ओळखून तो परत

तळ्याकाठी राजाला घेऊन आला. राजाने प्रधानाला घडलेली हकीगत सांगितली. सर्वजण लगेच राजवाड्यावर परतले.

राजवैद्यांनी राजाच्या दृष्टीसाठी तऱ्हेतऱ्हेचे खूप उपचार केले, पण कुठल्याच औषधाने गुण आला नाही. अखेर प्रधानाने इतर राज्यातले हकीमही बोलावले. पण छे! दृष्टी कशामुळे गेली हेच कुणाच्या लक्षात येईना. सर्व प्रजा हळहळत होती. प्रत्येक हकीम व वैद्य आपापल्या परी राजाला तपासून जात होता. वृद्धा परमेश्वराची प्रार्थना करीत होत्या. राजा मात्र दुःखी न राहता पद्मावती व प्रधानमंत्री यांचे सहाय्याने राज्य व्यवस्थित चालवीत होता.

एक दिवस तेजस्वी दिसणारा एक तपस्वी राजाला तपासण्याची अनुज्ञा मागू लागला. खरं म्हणजे राजा स्वतः तपासून घ्यायला कंटाळला होता. पण पद्मावतीच्या हट्टानुसार तो तयार झाला. तपस्वी जसजसा तपासत होता तसतसा त्याचा बदलता चेहरा पाहून पद्मावतीला आशा उत्पन्न झाली. सर्व तपासणी झाल्यावर तपस्व्याने सांगितले, 'उपाय आहे, पण अत्यंत कठीण आहे. करणार असाल तर सांगतो.' प्रधानाकडून आश्वासन मिळाल्यावर त्याने उपाय सांगितला. तो असा– 'येथून पश्चिमेकडे खू ऽ ऽ प दूर सातासमुद्रापलिकडे एक उंच टेकडी आहे. त्या टेकडीवर वीरसेन राक्षसाचा बंगला आहे. बंगल्याभोवती सुंदर बाग आहे. बागेत माणीक-पाचूंची सुंदर सुंदर झाडे आहेत. मध्यभागी एक झाड संबंध सोनेरी पानांचे असून त्याला लाल-लाल माणकं बसवलेलं एकचएक मोठं फळ आहे. त्या फळाचा तुकडा जर राजाच्या डोळ्यांवर फिरवला तर राजाची दृष्टी हमखास परत येईल. मात्र ते फळ मिळवणं फार कठीण आहे, कारण त्या संबंध बागेवरच

राक्षसांचा कडेकोट बंदोबस्त असून विशेषत: त्या झाडावर तर फारच बंदोबस्त आहे. त्या झाडाभोवती उंचच उंच तारांचं वर निमुळतं असलेलं कुंपण असून त्यातून विद्युत्प्रवाह सोडलेला आहे. जर कोणी त्याला स्पर्श करील तर खलास होईल. त्याची किल्ली स्वत: वीरसेनाजवळ असते. कारण त्या फळात वीर-सेनाचा प्राण असून फळ तोडलं तर तो मृत होईल.

उपाय सापडला, पण फारच कठीण. एवढ्या दूर जीवा-वर उदार होऊन जाणार कोण आणि गेलं तर यशस्वी होऊन कसं परतणार ? राजाच्या सल्ल्यानं प्रधानानं राज्यभर दवंडी दिली. ' जो कोणी शूर असं फळ आणून देईल, त्याला अर्ध राज्य व राजकुमारी अर्पण केली जाईल हो ऽऽ ' अनेक वीर या बक्षीसाच्या आशेनं प्रयत्न करीत होते. पण अयशस्वी होऊन परतत होते.

त्याच राज्यात एक गरीब म्हातारी व तिचा मुलगा रहात होता. जंगलात जाऊन रोजरोज लाकडं तोडून आणा, ती विका, मग त्यापुढं जेवण. मुलाला अगदी कंटाळा आला होता या जीवनाचा. त्यानं राजाची दवंडी ऐकल्यापासून ते फळ मिळविण्याचाच एक ध्यास घेतला होता. म्हातारी म्हणाली, ' बाबा आपण गरीब. तुझ्याजवळ ना घोडा, ना तलवार. मोठ-मोठे वीर परत येत आहेत. नाहक कशाला आपला बळी देतोस. ' पण मुलगा–शंतनु–काही केल्या ऐकेना. अखेर म्हातारीनं त्याला जाण्यास परवानगी दिली. एक दिवस सकाळी शंतनु म्हातारीचा निरोप घेऊन निघाला. म्हातारीनं त्याला बरोबर चटणी–भाकर दिली होती.

शंतनु निघाला तो सरळ पश्चिमेकडे चालत गेला. एका घनदाट जंगलातून तो चालत होता. सभोवती गर्द झाडी, वन्य

पशुंचे आवाज, मनुष्यवस्तीपासून अत्यंत दूर, कशाचे भान शंतनुला नव्हतं. मध्यान्ह उलटल्यावर त्याला खूप भूक लागली. दूरवर पाण्याचा खळखळाट ऐकू येत होता. शंतनु त्या दिशेनं निघाला. हात पाय धुवून वर आला व खायला सुरवात करणार तोच त्याला ठकठक आवाज आला. एक माणूस लाकडाशी काहीतरी करण्यात गुंतला होता. जवळ जाऊन पाहिलं तर एक अत्यंत सुंदर होडी व वल्हे तो बनवीत होता. शंतनु तसाच पहात उभा राहिला. दोन्ही वस्तूंवर शेवटचा हात मारून त्याने वळून पाहिले तर शंतनु उभा होता. त्या माणसाजवळ न्याहारी नव्हती. मग शंतनुजवळची चटणी-भाकर त्या दोघांनी हसत-खेळत खाल्ली. ऐन भुकेच्या वेळेस शंतनुनं भाकरी दिल्याबद्दल त्यानं त्याला होडी व वल्हं देवू केलं, पण ती होडी साधी नव्हती. जादूची होती. त्यानं शंतनूला त्या होडीची सर्व माहिती सांगितली. होडीत बसून वल्हं तीन वेळा वर केलं की, होडी आकाशात उंच उडते. होडी खाली उतरावयाची असेल त्या वेळी वल्हं खाली करायचं म्हणजे होडी उतरते. शंतनूला त्या दोन्ही वस्तु अतिशय आवडल्या. त्यानं त्या माणसाचे आभार मानून दोन्ही वस्तु स्वीकारल्या. लगेच होडी उडवून तो निघाला. जंगलामागून जंगले तो पार करीत होता. वाटेत एका जंगलात माणसं खूप जोरजोरानं भांडत होती. शंतनुनं होडी खाली उतरवली. त्या तिघांनी यालाच न्यायाधीश नेमलं. त्या तिघांना मिळून दोन वस्तु मिळाल्या होत्या. एक चप्पलजोड व एक तलवार. या त्या दोन वस्तु होत्या. त्या चपला घातल्या असता घालणारा माणूस अदृश्य होत असे व तलवारीचा स्पर्श मानेला झाला की माणूस मरत असे. तिघांपैकी प्रत्येकाला त्या वस्तु हव्या होत्या. प्रत्येकजण म्हणे, ' मी प्रथम या वस्तु पाहिल्या,

मला त्या हव्या.' शंतनुनं सर्व ऐकून घेतलं व तिघांनाही तुम्ही कोठून येत होता ते दाखवा म्हणजे मी निवाडा करतो असं सांगितलं. तिघंही जरा बाजूला गेल्यावर तलवार घेऊन शंतनूनं चपला घातल्या व अदृश्य होऊन, होडी उडवली. होडी उंच जात होती व हे तिघेही आश्चर्यानं आ वासून पहात होते.

शंतनु तेथून निघाला तो थेट वीरसेन रहात होता त्या टेकडीपर्यंत पोचला. राजधानीत ऐकल्याप्रमाणे खरोखरच तेथील बागेत कडेकोट बंदोबस्त होता. त्यानं विचार करून होडी थेट वीरसेनाच्या राजवाड्यातील गच्चीवर उतरवली. तलवार सरसावून व पायात जोडे घालून तो निघाला. गच्चीवर कुणी तरी होडीतून आलं आहे हे लक्षात येण्याआधी त्याला सर्व काम उरकायचं होतं.

एका खोलीतून खूप गडगडाटासारखा आवाज येत होता. तेथे पहाराही पुष्कळ होता. शंतनु हातातली तलवार लपवत लपवत तेथे जाऊन पोचला. मध्यभागी वीरसेन घोरत होता व सभोवती इतर राक्षस झोपलेल्या वीरसेनावर पहारा करीत होते. आता थांबून उपयोग नव्हता. शंतनुनं झरझर तलवार चालवायला सुरुवात केली. जादूची तलवार असल्यामुळे काय होते आहे हे कळायच्या आतच धडाधड राक्षस मरून पडले. अखेर शंतनु विरसेनजवळ पोचला. वीरसेन घोरतच होता. त्याला या घडामोडीचा मुळीच सुगावा नव्हता. शंतनु हळूच त्याच्या अंगावर चढला. खूप शोधल्यावर त्याच्या डोक्याखाली त्याला चावी मिळाली.

आतील घडामोडींचा बाहेरील राक्षसांना पत्ता लागण्याच्या आधीच झटपट शंतनु बाहेर पडला. वाटेतील राक्षसांना खलास करीत तो बागेतील त्या झाडाकडे निघाला. पण तेथे

पोहोचण्यापूर्वीच इतर राक्षसांना शंतनुचा पत्ता लागला. त्याची तलवार दिसत होती त्या रोखाने चोहीकडून धडाधड वार होऊ लागले. ते चुकवीत चुकवीत व राक्षसांचा संहार करीत तो त्या झाडाजवळ पोचला. कुणीतरी जाऊन वीरसेनाला उठवलं होतं. वीरसेन झाडाच्याच रोखानं येत होता. जर वीरसेन पोचला तर मात्र काहीच इलाज नव्हता. कारण त्या फळाशिवाय त्याचे इतरत्र मरण नव्हतं. शंतनुनं झटपट कुंपणाचं कुलुप उघडलं व ते फळ तोडलं. त्याबरोबर जवळ येत चाललेला वीरसेन धाडकन् कोसळला. सगळ्या राक्षसांची दाणादाण उडाली. त्याच धांदलीत शंतनु चटकन् गच्चीपर्यंत पोचला व त्याने होडी उडवली.

होडी उडालेली पाहताच एकदोन राक्षसांनी तिच्या मागोमाग उड्डाण केलं. पण शंतनुनं होडी उंच उडवली. अखेर राक्षसांची झेप तोपर्यंत पोचू शकली नाही. शंतनु सुखरूप आपल्या राज्यात परत आला.

त्यानं होडी एकदम राजवाड्यावर न उतरवता जंगलातच उतरवली. त्या माणसाचे आभार मानून व होडी परत करून तो झटपट पायी राजवाड्यावर आला. राजाच्या डोळ्यावरून फळ फिरवताच राजाची दृष्टी परत आली.

नंतर थाटामाटाने पद्मावती व शंतनुचा विवाह करण्यात येऊन शंतनुला राज्याभिषेक करण्यात आला. त्या होडीवाल्यालाही बोलावून त्याचा योग्य तो आदरसत्कार करण्यात आला. सगळीकडे आनंदीआनंद झाला.

# राजकन्या आसावरी

मैत्रिणींच्या घोळक्यात आसावरी अगदी उठून दिसे. स्वरूपसुंदर आसावरीला कशाचीच कमतरता नव्हती. नट्टापट्टा, मौजमजा करण्यात आणि गुणी स्वभावामुळे सगळ्यांकडून कौतुक करून घेण्यात आसावरी दंग होती. गोड गोड बोलण्याने आसावरी मैत्रिणींच्यातही तितकीच प्रिय झाली होती. तिच्या-भोवती मैत्रीणींचा सतत गराडा असे. त्या साऱ्यात आसावरीची जीवाभावाची मैत्रीण होती 'आमला'. आमला आसावरीला आवडण्याचे एकच कारण होते, 'तिची हुशारी!'

उलट आमला सौंदर्य देवाकडे विसरली होती आणि सौंदर्याचे आकर्षण घेऊन आली होती. तिला तिची हुशारी नको होती. तिला हवे होते 'आसावरीचे सौंदर्य – आसावरीचे भाग्य.' आसावरी तिच्या मनात सलू लागली होती. मनातल्या मनात ती आसावरीचा द्वेष करू लागली पण उघडपणे ह्या गोष्टी ती कोणापाशी बोलूही शकली नाही आणि काही करूही शकली नाही. सौंदर्याबरोबर आमला गोड बोलणे, मनमोकळे हसणेही हरवून बसली आणि आसावरीची प्रत्येक गोष्ट स्वतःला कशी मिळेल, आसावरी दुःखी कशी होईल याची वाट बघू लागली.

बिचारी आसावरी! तिला याची काहीच कल्पना

नव्हती. ती 'आमलावर' मनापासून प्रेम करीत होती. तिच्या हुशारीचे राजापाशी कौतुक करीत होती.

राजाच्या वैभवाने आता सोन्याचा कळस गाठला होता. वैभवाबरोबर 'सुखी जनता' हेही राजाचे सुंदर स्वप्न होते आणि त्यासाठी राजा सतत दक्ष रहात होता. राज्यातील प्रत्येक माणूस सुखी व्हावा, कोणावर अन्याय होऊ नये, कोणावर संकट आल्यास आपल्या मदतीचा हात त्याला मिळावा अशी राजाची इच्छा होती. राजाच्या दिवसाची सुरवात, प्रजाजनांच्या दर्शनाने व्हावी अशी राजाची प्रथा होती. त्या प्रथेनुसार, राजा रोज सूर्याचे दर्शन घेऊन तक्रारी ऐकण्यासाठी, दानधर्म करण्यासाठी सिंहासनावर येऊन बसत असे. एखाद्यावर आलेले संकट, एखाद्यावर झालेला अन्याय याची जातीने चौकशी करीत असे, त्यावर उपाय योजत असे. गोरगरीबांना ओंजळ भरभरून मोहरा देत असे. या साऱ्या कार्यक्रमाला राजाची लाडकी आसावरी हजर रहात असे.

परंतु प्रत्येक दिवस आपली निराळी कहाणी घेऊन उगवतो. आसावरीसाठी भरभरून आनंद घेऊन येणारा दिवस. आसावरीच्या नशीबाचे पारडे फिरताच काळाकुट्ट अंधार घेऊन आला. अगदी गुपचूप, चोरपावलांनी, कोणालाही कशाचीही जाणीव न देता. नेहमीप्रमाणे राजाने सूर्याची प्रार्थना केली आणि तो सिंहासनावर येऊन बसला. फुलासारखी टवटवीत आसावरी धावत राजाशेजारी येऊन बसली. ओळीने एकेक जण येऊन राजाला आपली कथा सुनवत होता. ओंजळभर मोहरा घेऊन राजाला दुवा देत, मुजरा करीत, निघून जात होता. सर्वांत शेवट असलेली म्हातारी काठी टेकत टेकत पुढे येऊ लागली. राजाचा अधिक वेळ घेऊ नये म्हणून भराभर येऊ

लागली. अचानक म्हातारीचा पाय त्या गुळगुळीत फरशीवरून घसरला व ती दाणकन जमिनीवर आपटली.

म्हातारीची पडतांना होणारी धडपड बघून आसावरीला हसू आवरेना. ती पोट धरधरून हसू लागली. म्हातारी राज-कन्येच्या हसण्याने लालेलाल झाली. तिच्या डोळ्यातून जणू ठिणग्या पडू लागल्या. रागाच्याभरात म्हातारीने राजकन्येला शाप दिला.

'तुझे मेलेल्या राजपुत्राशी लग्न होईल.'

म्हातारीचा शाप ऐकताच सारा दरबार स्तब्ध झाला. सारे काही क्षणार्धात घडले होते. राजकन्या आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी म्हातारीकडे बघत बसली. म्हातारी पाय आपटत राजवाड्याबाहेर जाऊ लागली. राजा आता भानावर आला. सिंहासनावरून उतरून राजाने म्हतारीकडे धाव घेतली. 'शाप' मागे घेण्याबद्दल तो म्हातारीला विनवू लागला. आपल्या लाडक्या राजकन्येची होणारी दशा आठवून राजाला अश्रू आवरेनात. आसावरी बावरून जाऊन राजाला बिलगली. सारा राजवाडा एकाच शोकसागरात बुडून गेला आणि आसावरी ज्याच्यावर जीवापाड प्रेम करीत होती ती 'आमला' तिला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

राजा म्हातारीला पुन्हा पुन्हा विनवत होता पण झाल्या गोष्टीला म्हतारीकडेही उपाय नव्हता. शाप–बाण एकदा धनुष्यातून सुटला होता तो मागे फिरविणे कोणाच्याच हाती नव्हते. आमीबाईंनी आपल्या रागाला आवर घालत उःशाप दिला.

' दूर पूर्वेकडे, एक घनदाट जंगल होते, जंगल ओलांडून गेल्यावर एक मैदान होते, त्या मैदानात शापीत राजपुत्राची

पेटी पुरलेली होती. त्या पेटीजवळ एक सुंदर नक्षीकाम केलेली भलीमोठी परडी होती. ती परडी वरपर्यंत भरेल! तिच्या एकट्या राजकन्येने एका रात्रीत फुलांनी भरून टाकायची होती. पूर्ण भरलेल्या परडीतील फुलांच्या सुगंधाने राजपुत्र जागा होणार होता. अर्थात जिने कोणी ती परडी वरपर्यंत भरलेली असेल तिच्यावर खूष होऊन राजपुत्र तिच्याशी लग्न करील हे उघडच होते. राजपुत्राला जीवंत करण्यासाठी तीन अटी मात्र काटेकोरपणे पाळणे आवश्यक होते....

१. परडी कुमारीकेनेच भरावयाची होती.

२. एकट्या मुलीनेच परडी फुलांनी भरावयाची होती.

३. एका रात्रीत सर्व परडी भरली गेली पाहिजे.

शापावरील उपाय सांगताच म्हातारी तडक राजवाड्या-बाहेर पडली. राजा सुन्न होऊन बसून राहिला. राजाचा पराक्रम, शौर्य, संपत्ती सत्ता या साऱ्या गोष्टी यापुढे गौण होत्या. तिथे फक्त राजकन्येच्या निष्ठेचा कस लागणार होता. अल्लड-पणामुळे झालेल्या हास्याची किम्मत एकट्या राजकन्येला भरावी लागणार होती. पण आता नुसते दु:ख करण्यात काहीच अर्थ नव्हता. प्रयत्न केला तरच यश येणार होते!

राजाने आपले शिपाई परडी शोधण्यासाठी पूर्वेकडे पाठवून दिले. दोन दिवसांनी गेलेले शिपाई परत आले. त्यांना ती भली मोठी परडी सापडली होती. परडी [illegible] साऱ्यांना एक प्रकारचा हुरूप आला.

परडी फुलांनी भरावयाची होती व परडीजवळ एक मैदान होते. अनेक चांगल्या, दर्दी माळ्यांना बोलावून [illegible] पेटीजवळ एक भलीमोठी, सुंदर फुलबाग केली. जिकडे नजर

टाकावी तिकडे फुले फुलली होती. इथपर्यंतच्या साऱ्या कामाला राजा, राजाचे लोक तत्पर होते पण पुढील अवघड काम एकट्या राजकन्येलाच करायचे होते. ना कोणाची सोबत, ना कोणाची मदत !

एका पौर्णिमेच्या दिवशी राजकन्येने परडी भरावी असे ठरले. आकाशातील चंद्राने आसावरीला साथ दिली तर काहीच बाध येणार नव्हता.

आसावरी तिच्या मैत्रिणी, आमला साऱ्याजणी संध्याकाळपासूनच त्या नंदनवनात येऊन बसल्या. साऱ्याजणी आसावरीला धीर देत होत्या. रात्र होताच सर्वांनी आसावरीचा निरोप घेतला. एकटेपणाची जाणीव होताच आसावरीच्या डोळ्यात टचकन पाणी आले. साऱ्या ताटव्यावर नजर टाकून तिने आपले अश्रू पुसले. त्या सुंदर, सुवासिक फुलांकडे बघून आसावरीचे मन संमिश्र भावनांनी भरून गेले. त्या रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्यात राजकन्येचा उज्वल भविष्यकाळ हसत होता, तिला खुणावत होता. आकाशातील चंद्राचे दर्शन घेऊन आसावरीने परडी भरण्यास सुरुवात केली. प्रत्येक फूल आसावरीला सुखाच्या रस्त्यावर आणून सोडत होते. छोटी टोपली भरभरून राजकन्या ती फुले त्या भल्या मोठ्या परडीत टाकत होती. पण परडीचे पोट रिकामेच रहात होते. परडीचे रिकामेपण आसावरीचे हसू, उत्साह हिरावून घेऊ लागले, तरी बिचारी भराभर फुले तोडत होती आणि परडी भरत होती.

चंद्र परतीच्या प्रवसाला लागला, चांदण्या लुकलूक करून दमल्या पण परडी.... आसावरीच्या नाजूक पावलांना आता एक पाऊल पुढे टाकण्याचे त्राण राहिले नव्हते, तरी ती तशीच पाय ओढत ओढत फुले तोडत होती, टोपली भरत

होती, परडीत टाकत होती. काही वेळाने, परडी थोडीशीच भरावयाची राहिली आहे हे दिसताच आसावरीला थोडीफार हुशारी वाटू लागली. तिची पावले भराभर पडू लागली. हात पटापट फुले तोडू लागले. परडी आता अगदी काठापर्यंत आली. आता एकच टोपली.... आसावरीच्या आनंदाला पारावर राहिला नाही. आनंदाने तिच्या शरीराला कंप सुटला. तिच्या थकल्याभागल्या शरीराला आनंदाची ती बेहोषी पेलवली नाही. भरलेली परडी घेऊनच ती धाडकन् जमिनीवर कोसळली. एका पराक्रमी, वैभवशाली राजाची लाडकी कन्या, एक स्वरूपसुंदरी, नाजूकराणी, श्रमांमुळे मातीत पडली, पडूनच राहिली. उःशापाच्या अटींमध्ये कोणतीही कसूर व्हायला नको म्हणून राजा, प्रजा मैदानापासून दूर, होणाऱ्या सूर्योदयाची वाट पहात थांबले होते. राजकन्येच्या भल्यासाठी देवाची आळवणी करीत होते.

पण आसावरीला प्रीय असणारी आमला थोडीच सदिच्छेत सहभागी होणार! ती तर तिथेच झुडूपात दडून बसून आसावरीच्या पडण्याची वाट बघत होती. आसावरी बेशुद्ध होऊन पडताच आमला धावत धावत परडीपाशी आली. परडी भरायला फक्त एका टोपलीभर फुलांची कमी होती. आमला आसावरीजवळ आली. टोपलीतील फुले उधळली गेली होती. आमलाने पटापट सारी फुले गोळा केली, टोपली भरली. एका हाताने आसावरीला उभी करून दुसऱ्या हातात तिने टोपली धरली. आसावरीला ओढत ओढत परडीपाशी आणली. आसावरीचे नशीब ओढून घेताना आमलाला थोडसेही दुःख झाले नाही. एकवार आपण आसावरीवर विजय मिळवला या धुंदीत ती सारं काही करीत होती. आसावरीला परडीपाशी

आणल्यावर आमलाने आसावरीच्या हाताने भरलेली टोपली परडीत रिकामी केली. परडी अगदी गच्च भरली. असे बघताच आमलाने आसावरीला भराभर ओढत परडीपासून दूर नेऊन झोपवले. फुलांच्या सुगंधाने सारा परिसर भरून गेला होता. सेवकाने वर काढून ठेवलेल्या पेटीचे दार हळहळू उघडू लागले. आमला धावत पेटीपाशी आली. पेटीतील राजपुत्र हळूहळू जागा होत होता. डोळे चोळत तो उठून बसला. रात्रभर झोपून सकाळी जाग यावी, इतका तो प्रसन्न दिसत होता. आमला अगदी अवाक् होऊन बघत राहिली. का बरं राजपुत्राला असा शाप मिळाला असेल ? आणि त्यातून सुटका होताच राजपुत्र परत पहिल्यासारखा कसा झाला ? अनेक प्रश्न आमलाभोवती पिंगा घालू लागले. एवढ्या चांगल्या राजपुत्राची शापातून सुटका झाली नाही, मग आपण तर खोटेपणाने वागलो, आपल्यावर प्रेम करणाऱ्या मैत्रिणीला फसवले ? हा खोटेपणा आपल्याला भोवणार तर नाही ना ? क्षणार्धात आमलापुढे सारे प्रश्न नाच करून गेले. पण झटकन् तिने स्वतःला सावरले. सकाळ व्हायच्या आधी राजपुत्राला घेऊन दूर पळणे आवश्यक होते. राजपुत्राला तिने आपल्या हाताने धरून उठवले आणि पेटीबाहेर काढले. पेटीबाहेर येताच राजपुत्र अनिमिष नेत्रांनी सगळीकडे बघू लागला. आमला तर त्याला जीवदान देणाऱ्या देवतेप्रमाणे भासली.

आमलाने राजपुत्राला घाईघाईने, झाडात लपवून ठेवलेल्या घोड्यापाशी घेऊन आली. घोडा बघताच राजपुत्राने त्याचा लगाम आपल्या हातात घेतला. आमला घोड्यावर चढून बसली. पाठोपाठ राजपुत्र चढला आणि राजपुत्राने घोड्याला टाच दिली.

सकाळ होताच राजा हसतमुखाने राजपुत्राच्या पेटीपाशी आला. बरोबर मोठा लवाजमा होताच. राजाला पेटी रिकामी दिसली. राजाच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. कधी एकदा आसावरीला डोळे भरून पाहतो असे त्याला झाले. आसावरी.... ती तर कुठेच दिसत नव्हती. सगळेजण इकडे तिकडे धावले. तेवढ्यात सगळ्यांचे लक्ष एका दासीच्या ओरड्याकडे गेले. सगळे तिकडे धावले. आसावरी मातीत पडलेली होती. राजा आसावरीकडे धावला.

आसावरीची ही दशा, राजपुत्राचा तर पत्ताच नाही. आपली आसावरी तरी मिळाली याचाच आनंद राजाला झाला. वैदूला बोलावून आसावरीला शुद्धीवर आणण्यात आले. शुद्धीवर आल्यावर आसावरीला एकेक घटना आठवू लागल्या. आणि ती हुंदके देऊन देऊन रडू लागली. राजाने तिची समजूत काढली व हळूहळू राजपुत्राविषयी विचारण्यास सुरुवात केली. आसावरीची शुद्ध जाण्याआधी, तिला 'आमला' ओढून नेत आहे असा भास झाला होता. नंतरचे तिला काहीच समजले नव्हते.

काय घडले, ते सर्वांच्याच लक्षात आले. राजाने 'आमलाला' शोधण्यासाठी चारी बाजूंनी शिपाई पाठवले पण काही उपयोग झाला नाही. दुःखी आसावरीला घेऊन राजा परतला.

आसावरी आता एकदम अबोल झाली होती. तिला धड जेवण जात नव्हते की पूर्वीसारख्या गप्पा सुचत नव्हत्या. तिचे दुःख बघून राजाही पार खचून गेला. राजाचे राज्यावरचे लक्ष उडाले. राज्याची सारी घडी विसकटून गेली. राजाच्या वैभवाला ओहोटी लागली. त्याचाच फायदा घेऊन शत्रूने स्वारी

केली. राजाचा पराभव झाला. आणि अती दुःखाने राजाचा अंत झाला. राजकन्या आसावरी आता अगदी पोरकी झाली. तिचेही कशात लक्ष लागत नव्हते, जीवनाला कंटाळून आसावरी तिर्थक्षेत्रे हिंडू लागली. मनाला बरे वाटले तर एखाद्या ठिकाणी चार दिवस रहावे तर कधी दुसरेच दिवशी मुक्काम हलवावा.

अशीच अेकदा आसावरी 'गांधारी' नगरीच्या 'कृष्ण मंदीरात' बसली असतांना त्या नगरीचा राजा येत असल्याची वर्दी भालदार–चोपदारांनी दिली. आसावरी बसल्या जागेवरूनच सारे काही बघत होती. प्रथम राजा आला. अगदी इतर भक्ताप्रमाणेच लीन होऊन आणि राणी.... ही का बरं डोलीत बसून आली? देवाच्या दारी येतांना हा थाट का बरं? असे अनेक विचार आसावरीच्या मनात येत होते, तोवर डोली खाली उतरवली गेली. राणी त्यातून बाहेर आली आणि खुरडत खुरडत देवाच्या पायापाशी आली. आसावरी आश्चर्याने राणीकडे बघतच राहिली. 'आमला!' मोठमोठे डोळे करून आसावरी मनाची खात्री करून घेत होती. हो, नक्की आमलाच! म्हणजे हा राजाऽऽ.... आसावरीने मनातील विचार झटकून टाकले. झाल्या गोष्टी घडून गेल्या होत्या, आता त्याचे काय? पण....पण आमलाला काय झाले? हिचे पाय असे अधू का बरं झाले? आमलाने तिच्यावर केलेला अन्याय विसरली आणि तिच्या पायांबद्दल विचार करत बसली. 'आमला' ध्यानस्थ बसून देवाला आळवत होती.

'आमला'ला ओळख द्यावी!' आसावरीच्या मनात विचार चमकून गेला. छे! छे!! पांगळी झाली असली तरी आमला राणी होती आणि आसावरी एक यात्रेकरू.

आसावरी ह्या घटनेनें अगदी सुन्न होऊन गेली. नको, नको म्हटले तरी गतजीवनातील स्मृती आसावरीभोवती पिंगा घालत होत्या. आम्ला तिच्या साऱ्या भवितव्याशी खेळली होती. स्वत:चे जीवन सुरळीत, सुरक्षित असतांना 'आम्लाने' आपल्या जीवनात डोकावून काय साधले? स्वत:चा कुरुप चेहरा आम्लाला एवढा भेडसावत होता की आपल्या प्रिय मैत्रिणीचा विश्वासघात करावा असे तिला वाटले. विचार करता करता आसावरीचा राग उफाळून आला. माझी दुर्दशा केली, बाबांच्या, राज्याच्या नाशाला कारणीभूत झाली आणि स्वत:ने काय साधले? पांगळेपण !

'गांधारी' नगरीच्या राजा-राणीच्या करमणुकीसाठी, गोष्टी सांगण्यासाठी बायका राजवाड्यावर जातात हे आसावरी ऐकून होती. आसावरीने ठरविले की राजा-राणीला गोष्ट सांगण्यासाठी आपणही जायचे.

एका संध्याकाळी ती राजवाड्यावर गेली. तोंडावरून खालपर्यंत पदर ओढून घेऊन, दरवानास आपला येण्याचा हेतू सांगितला. दरवानाने आसावरीला थेट राणीच्या महालात नेऊन सोडले. राणीच्या महालात, राजा आहे बघून आसावरी चांगलीच सुखावली.

आसावरीने मुजरा करून गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला. आसावरी आपलीच कथा–एक दंतकथा असल्याच्या आविर्भावात सांगू लागली. आपलीच कर्म-कहाणी आवाजात कोणताही चढउतार होऊ न देता, सुंदर शब्दांत गुंफत होती. आपला चेहरा त्यांच्यापासून लपवून, राजाराणीच्या चेहऱ्यावरचे भाव टिपत होती.

कथाभागात आपले आयुष्य गुंतले गेलेले पाहून राजा अगदी अवाक् झाला होता, तर राणी तर त्या कथेने, परिचित आवाजामुळे बेचैन झाली होती. पुढची कथा ऐकणं तिला असह्य झाले तेव्हा 'आसावरी' म्हणून आर्त आवाजात राणी ओरडली. आसावरीने झटक्यात तोंडावरचा पडदा बाजूला केला आणि ती 'आमला'पाशी गेली.

आसावरी ! आसावरी ! ! करीत आमलाने आसावरीला घट्ट मिठी मारली आणि ती ओक्साबोक्शी रडू लागली. आसावरीही झाल्या घटनेने बावरून गेली. राजाने आमलाला शांत केले व खुलासा करण्याविषयी विनविले.

आमलाने आसावरीची अपूर्ण कथा स्वतःचे नाव गुंफून पूर्ण केली. आणि आसावरीच खरी राणी आहे असे सांगितले.

"आमला ! तुझे पाय...." आसावरीने न राहवून विचारले.

"आसावरी काय सांगू तुला ? अविचाराने मी सारे केले, पण माझे मन तुझ्याभोवती रुंजी घालत होते. तुझ्या जीवनात पसरलेली निराशा, तुझे त्या रात्री दुखलेले पाय, तुझी माझ्यावरची माया....या साऱ्या विचारांनी मला एक दिवस सुखाने झोपू दिले नाही. आणि तुझ्या त्या दिवशीच्या पायांचे दुखणे नकळत मी माझ्यावर ओढवून घेतले आणि अचानक एक दिवस माझ्या पायातली शक्ती गेली आणि मी पांगळी झाले. माझ्या पापाचे प्रायश्चित्त मला मिळाले आसावरी. पण तुला बघून मी आता सुखावले आहे. तुझ्या ऋणातून मी मुक्त होणार आहे." असे म्हणत आमलाने आसावरीचा हात राजाच्या हातात दिला.

आसावरीने आमलाला घट्ट मिठी मारली आणि दोघी रडूही लागल्या आणि हसूही.

आसावरीचे लग्न राजाशी झाले. तिघांनीही एकमेकांना समजून घेतले आणि तिघेही सुखासमाधानाने राहू लागले.

❊

# दुष्ट म्हातारा आणि चतुर अनिल

चौदा-पंधरा वर्षांचा अनिल हा शाळेत कौतुकाचा विषय होता. आज त्याला नानाविध विषयांत अनेक पारितोषिके मिळाली म्हणून तो नाचत-नाचतच घरी गेला. पण– घरी सावत्र आईनं त्याचं कौतुक करण्याऐवजी घरी परतायला उशीर केल्याबद्दल खूप चोप दिला. आपण आता मोठे आहोत, हुषार आहोत तरी पण मारच खावा लागतो, याचं अनिलला वाईट वाटलं. वडील सावकार होते, पण आईपुढं त्यांचं काय चालणार? देवानं आई नेली म्हणून देवावरसुद्धा तो चिडला व तसाच रडत निघाला.

रडत रडत अनिल खूप दूर गेला. मावळत्या किरणांमुळे सगळं कसं लाल लाल दिसत होतं. तो एका मळ्यात पोचला. सुंदर सुंदर फुलझाडं तिथं होती. रातराणी, पारिजातक यांचा सुगंध वातावरण धुंद करीत होता. मध्यभागी एक अत्यंत सुंदर व स्वच्छ झोपडी होती. आत एका सुरईत थंडगार पाणी व थाळीत ताजी निरनिराळी फळं होती. दमल्यामुळे व खूप भुके-मुळे अनिलनं कशाचाही विचार न करता फळांवर यथेच्छ ताव मारला व तेथेच असलेल्या खाटेवर तो झोपला. गाढ झोपेत असतानाच आपण खूप उंचावरून वेगानं जात आहोत असे त्याला जाणवले. तो हळुहळू जागा झाला. त्याने डोळे किलकिले

करून पाहिले. एका अति शुभ्र घोड्यावर एक दाढीवाला त्याला बसवून घेऊन जात होता. घोडा खूप उंचावरून आकाशाकडे झेप घेत होता. अनिल घाबरला, पण तो हुषार होता. परिस्थितीची नीट कल्पना येण्यासाठी झोपेचेच सोंग त्याने पुढे चालू ठेवले.

हळूहळू घोड्याचा वेग कमी झाला. पहाता पहाता आकाशातच एका राजवाड्यासमोर तो घोडा थांबला. दाढीवाल्यानं अनिलला उतरवलं व त्याला घेऊन तो आत गेला. तेथील ऐश्वर्य आणि थाटमाट पाहून अनिल चकीत झाला. तो बसला होता त्या दालनात पाचू, माणिक व हिऱ्यांची अति मनोहर झुंबरं टांगलेली होती. चारी बाजूला बसण्यासाठी सोन्याची सिंहासनं होती. याप्रमाणे निरीक्षण करीत असतानाच तो दाढीवाला कपडे बदलून आला. त्याच्या मागोमाग अप्सरेसमान अशी सुन्दर मुलगी हातात सरबताचे पेले व फळांनी भरलेली तबकं घेऊन आली. दाढीवाल्याच्या आग्रहावरून अनिलनं त्या फळांचा यथेच्छ समाचार घेतला व अमृततुल्य असं ते सरबत घेतलं. नंतर त्या दाढीवाल्यानं स्वतः अनिलला सगळा राजवाडा दाखवला. एका ठिकाणी एका पाठोपाठ एक सात खोल्या होत्या. त्यातील प्रत्येक खोलीत काहीतरी अद्भुत होतं. एका खोलीत बोलणारा पक्षी, दुसरीत गाणारं झाड, तिसरीत सोनेरी पाण्याचा हौद, चौथीत एक धारदार तलवार, पाचवीत एक शुभ्र घोडा व सहावीत एक सुंदर अंगरखा होता.

दाढीवाल्यानं अनिलला कुठही हिंडण्यास परवानगी दिली. फक्त सातवी खोली उघडण्याचा प्रयत्न करू नकोस, जर केलास तर याद राख म्हणून सांगितलं व तो निघून गेला.

अनिल विचार करीत तसाच बसला. तेवढ्यात ती मुलगी आली व त्याला जेवायला चलण्याचा आग्रह करू लागली.

अनिलने तिला विचारलं, 'तू कोण? हा दाढीवाला कोण? मला इथं का आणलं हे सर्व सांग.' जेवता जेवता तिने सर्व सांगण्याचे मान्य केले. हळुहळू अनिलला सर्व हकिगत समजली. ती मुलगी प्रतापसेन राजाची राजकन्या होती. एक दिवस सेवकांना चुकवून ती एकटीच घोडदौड करता येते का नाही हे पहात राजवाड्यापासून दूर गेली. तहान लागली म्हणून ती त्या मळ्यात गेल्याबरोबर दाढीवाल्याने तिला पकडलं व इथे घेऊन आला. तो येईल तेव्हा त्याला सुग्रास अन्न घालण्याचं काम फक्त तिला करावं लागतं. त्या दाढीवाल्यानं एक मोठा यज्ञ सुरु केला होता. त्यात त्याला एक मुलगा व एक मुलगी यांची आहुती द्यायची होती. म्हणजे त्याला जवळजवळ अजिक्यपद प्राप्त होणार होतं. कालच यज्ञ पूर्ण झाला होता. आता फक्त हे बळी दिले की झालं म्हणून सुटका करून घ्यायची तर दोन-तीन दिवसात व्हायला हवी होती. सगळी हकीगत सांगून राजकन्या रडू लागली. अनिल धीराचा होता. तो म्हणाला, 'रडत बसून काय उपयोग? आपण त्या खोल्यांतील वस्तूंच्या सहाय्याने काय करता येतं ते पाहू या.' ती दोघं पुन्हा त्या खोल्यातून हिंडू लागली. प्रथम ते पोपटाजवळ गेले. इतर गप्पा मारल्यावर अनिलनं त्याला सातव्या खोलीत काय आहे ते विचारलं. पोपट म्हणाला, 'तू शूर आहेत. तुला मी सगळं सांगतो. तुझ्याबरोबर तू आमची पण सुटका कर. आम्हाला इथं खूप कंटाळा आला आहे. पण आता तो दाढीवाला यायची वेळ झाली आहे. उद्या तू ये' 'बरं' म्हणून ती दोघे पहिल्या दालनात आली. तोच तो दाढीवाला आला. सगळ्यांची बरोबरच जेवणे उरकली. अनिलचे जेवण अगोदरच झाले असल्यामुळे तो नुसतेच पोटभर जेवण्याचे नाटक करीत होता. दाढी-

वाल्याला या पोरांच्या गडबडीची काहीच कल्पना आली नाही. दुसऱ्या दिवशी दाढीवाला गेल्यावर पोपटाने अनीलला सगळी माहिती सांगितली. चौथ्या खोलीतील तलवार जादूची आहे व दाढीवाल्याखेरीज इतर कोणालाही त्यामुळे मरण येतं. तसेच तो अंगरखाही जादूचा असून, तो घातला असता स्वतःवर कितीही वार झाले तरी अपाय होणार नाही, असा त्याचा गुण आहे. तो घोडा हवेतून उत्तम घोडदौड करणारा असून त्याला तीन चापट्या दिल्या तर तो खूपच उंच उडतो व एक चापटी दिली की खाली येऊ लागतो. शिवाय लगाम ओढून वेग कमी-जास्त करता येतोच. या सातव्या खोलीत मात्र तीन रंगाचे फक्त तीन खडे आहेत. एक तांबडा, एक निळा व एक पांढरा. घोडा घेऊन निघाल्यावर तो पाठलाग करीलच. तेव्हा प्रथम पांढरा खडा तुझ्या घोड्यामागं खाली टाकून दे. त्यामुळे इतके उंच डोंगर निर्माण होतील की सहसा तो येऊ शकणार नाही. पण जर तो आलाच तर दुसरा निळा खडा टाक. त्यानं मोठमोठे अफाट समुद्र तयार होऊन पर्वतप्राय लाटा निर्माण होतील व त्यात तो खलास होईल. पण तरीही तो आलाच तर शेवट तांबडा खडा टाक. त्यामुळे अग्निप्रलय निर्माण होऊन त्यात मात्र नक्कीच तो मरेल. म्हणून या तिन्ही खड्यांना तो फार जपतो आहे. ती खोली मात्र तुला सहजासहजी उघडता येणार नाही. तिची किल्ली तुला सोनेरी हौदात बुडी मारून काढावी लागेल आणि हौदात बुडी मारली की त्याला ते लगेच कळेल अशी व्यवस्था आहे. तसंच तुझं सर्व शरीरही सोनेरी होईल. म्हणून तू किल्ली घेऊन वर आलास की लगेच या झाडाचे पान सर्व शरीरभर फिरव म्हणजे तुझं शरीर पूर्ववत् होईल व वेळ न गमावता लगेच खोली उघडून ते खडे घे. हिला तलवार व

अंगरखा घेऊन घोड्यावर सज्ज रहायला सांग. खडे घेऊन तू लगेच घोडा उडव. यात थोडीसुद्धा ढिलाई झाली तर तो येऊन पोहोचेल. मग मात्र काही उपाय चालणार नाही.

राजकन्या अरुंधती व अनिल लगेच देवाचे स्मरण करून कामाला लागले. चटकन् बाहेर पडता येण्यासाठी त्यांनी सर्व दालनांचे दरवाजे उघडून टाकले. सहज नेता येतील एवढी माणकं व पाचू गोळा करून घेतले. नंतर अंगरखा, तलवार घेऊन अंरुधती घोड्याजवळ सज्ज होऊन उभी राहिली. अनिलने धपकन् हौदात बुडी मारली, किल्ली घेतली व चटकन् बाहेर येऊन झाडाचं पान सर्वांगावरून फिरवलं. खोली उघडून तीनही खडे घेतले, अंगरखा घातला आणि अरुंधतीला पुढे बसवून घोडा हवेत उडवला. तितक्यात दाढीवाला आलाच. या दोघांना पळून जाताना पाहून त्याने पाठलाग सुरू केला. तीन चापट्या देऊन अनिलनं घोडा खूऽऽप उंच उडवला. तरी-सुद्धा तो जवळ येतो आहे असं पाहून त्यानं प्रथम पांढरा खडा टाकला. मागं वळून पहातात तर अस्मानापर्यंत भिडलेले डोंगर त्यांना दिसले. आता कसला तो येतो म्हणून अनिल खूष झाला. पण अरुंधतीचं लक्ष गेलं. पहाते तर तो डोंगर ओलांडून खूप जवळ येत होता. लगेच त्यांनी निळा खडा टाकला. पण आश्चर्य म्हणजे त्या पर्वतप्राय लाटांतूनही तो आलाच. आता मात्र तांबडा खडा टाकणे प्राप्तच होते. जर यातूनही तो वाचला तर ? पण लगेच अनिलला पोपटाचे बोलणे आठवले. त्याने तांबडा खडा खाली टाकला. त्याचा मात्र उपयोग झाला. गगनव्यापी ज्वाळात तो जळून खाक झाला. अनिलनं एक चापटी देऊन घोडा जमिनीवर उतरवला. थोड्याच वेळात ते अनिलच्या घरी पोहोचले. त्याला पाहून अनिलच्या वडिलांना

अत्यंत आनंद झाला. बरोबर आणलेले पाचू, माणकं व सुंदर राजकन्या पाहून त्याची आई सुद्धा त्याचे गोडवे गाऊ लागली. नंतर त्यानं प्रतापसिंहाला निरोप धाडला. कन्येला पाहून प्रतापसिंहाचं हृदय आनंदातिशयानं उचंबळून आलं. त्यानं अरुंधतीचा शोध लावणारास 'अर्धं राज्य बक्षिस देईन' म्हणून जाहीर केलं होतं. त्याप्रमाणे त्यानं अर्धं राज्यही दिलं व दोघांचा विवाहही करून दिला.

अनिलनं पुन्हा एकदा घोड्यावरून तिथं जाऊन खूप सोनं, माणकं, पाचू वगैरे आणले. आणि प्रजाजनांना वाटले. ते गाणारं झाड त्यानं आपल्या बागेत लावलं. एक खास महाल बनवला. त्यात पोपटाला मोकळं ठेवलं. बागेतील हौदात सोनेरी पाणी सोडलं. अशा रीतीनं तो उत्तम राजा बनला.

# कर्तव्यपालन

फार वर्षांपूर्वी चंद्रपूर राज्यात 'प्रतापसेन' नावाचा राजा राज्य करीत होता. प्रतापसेन आणि त्याचा प्रधान दोघेही राज्यकारभाराच्या बाबतीत सारखेच होते. त्यांनी नानाविध कर जनतेवर बसविले होते. सरकारी तिजोरी पैशांनी कशी भरेल याचाच फक्त ते विचार करीत पण आपण कर बसविल्यामुळे जनतेचे कसे हाल होताहेत, त्यांच्यासाठी कायकाय सुखसोयी करायला हव्या तिकडे त्यांचे अजिबात लक्ष नसे. त्यांच्या राज्यात गुंडांना कडक शासन होत नसे. त्यामुळे राज्यात गुंडगिरी वाढली होती. विधवांना, अपंगाना आधार उरला नव्हता. राजरोस चोऱ्यामाऱ्या होत असत.

पण राजा आणि प्रधान यांना त्याची क्षिती नव्हती. ते आपले चैन, विलास, ख्यालीखुशालीत दंग होत असत. राजा आणि प्रधान दोघांनाही एकएक मुलगा होता. राजपुत्र प्रकाश आणि प्रधानपुत्र श्रीकांत दोघेही सारखेच वाढत होते. दोघांनाही एकेक स्वतंत्र महाल होता. दोघांनाही सारखेच शिक्षण दिले जात होते. त्यांच्यासाठी निरनिराळ्या सोयी राजवाड्यातच करवून घेतल्या होत्या. महालाभोवती सुन्दर बगीचा, जलक्रीडा करण्यासाठी मोठा सुन्दर जलाशय, रंगीबेरंगी माशांनी युक्त असलेले मत्स्यालय—सारं काही होतं. दासदासी अखंड सेवेला

हजर असत. दागदागिने, कपडालत्ता, कशाची कमतरता असणार त्यांना ? आणि तरीही ते दोघे सुखी नव्हते.

कारण घोडदौड आणि रोजचे ठराविक शिक्षण झाले की त्यांना कसलाही उद्योग नसे. पाणीसुद्धा ते स्वत:चे स्वत घेऊ शकत नसत, कारण नोकर उभाच असे.

कंटाळून खूप वेळा ते आपल्या महालाबाहेर गच्चीत उभे राहून दूरवरची सृष्टीशोभा पहात असत. त्यांच्या राजवाड्या-जवळच एक छोटंसं टुमदार घर होतं. त्या घरातही त्या दोघां-एवढाच एक मुलगा होता. प्रकाश आणि श्रीकांत हे दोघेही पुष्कळ वेळा त्या मुलाचा दिनक्रम पहात असत. त्यांना त्याचा खूप हेवा वाटे. तो मुलगा मनात आलं की आईला सांगून मित्रांकडे खेळायला जात असे. कधी आईला पाणी भरायला मदत करीत असे, कधी वडिलांबरोबर बाजारात जात असे. त्याची कामं तो करीत असे. त्याचं जीवन कसं स्वतंत्र होतं, प्रकाश आणि श्रीकांत यानाही असं स्वतंत्र जीवन जगायचं होतं. त्यांना ओढ्यावर जाऊन डुंबावसं वाटे, विहिरीचं पाणी ओढावसं वाटे, निदान स्वत:ची कामे तरी स्वत: कराविशी वाटत. पण ते कसं शक्य होतं ? राजपुत्र नुसता जरी बाहेर निघाला तरी दोन-चार सेवक इकडून तिकडून धावतच. त्याच्या महालात एका सोनेरी पिंजऱ्यात एक पोपट होता. त्या पोपटाशी प्रकाश नि श्रीकांत आपली तुलना करीत असत. सोन्याचा झाला तरी तो पिंजराच ना ? एक दिवस राज-पुत्राच्या मनात काय आलं कुणास ठाऊक, त्यानं सेवकाकरवी त्या शेजारच्या मुलाला बोलावणं धाडलं. राजपुत्रानं आपल्याला बोलावलं आहे हे ऐकून त्याला नवलच वाटलं, पण त्याला

कुठं वेळ होता ? आज त्याच्याकडे पाहुणे जेवायला येणार होते. त्यानं 'संध्याकाळी येतो' म्हणून निरोप धाडला.

ठरल्याप्रमाणे संध्याकाळी तो राजपुत्राला भेटायला आला. राजपुत्रानं त्याचा चांगला आदरसत्कार केला. बसायला भारी आसन दिलं आणि सांगितलं, 'माझं तुमच्याकडे एक काम आहे. रोज मी गच्चीत जेव्हा जेव्हा उभा राहतो, त्या त्या वेळी तुमचा दिनक्रम पहात असतो. मला तुमच्या जीवना-बद्दल अत्यंत आस्था आहे. या सोनेरी पिंजऱ्यात अडकलेल्या पोपटासारखी आमची स्थिती झाली आहे. कंटाळा आला आहे आमच्या आयुष्याचा आम्हाला. ना काम ना धंदा. थोडे दिवस असं केलं तर ? आमच्या नाट्यशाळेत मी सांगून ठेवलं आहे. काही दिवसांसाठी आपण आपल्या भूमिका बदलल्या तर ? थोडे दिवस तुम्ही राजपुत्र बनायचं. तुम्हालाही कष्ट कमी पडतील आणि आरामात रहायला मिळेल."

त्या मुलाला – शशीधरला राजपुत्राचं बोलणं ऐकून नवल वाटलं. तो म्हणाला, "सरकार, रागावणार नसाल तर सांगतो. आपण स्वतःचं जीवन सोनेरी पिंजऱ्यातल्या पोपटा-प्रमाणे करून घेतलं आहे म्हणून मी–तात्पुरता राजपुत्र झालो तरी माझे कष्ट कमी होणार नाहीत. उलट वाढतीलच, कारण राज्यकारभारात किती लक्ष घालायला हवं आहे. गुंडांचा बंदोबस्त व्हायला हवा. बेकारांना रोजगार द्यायला हवा. गावोगावी विहिरी खोदायला हव्यात. लोकांचे पाण्यावाचून किती हाल होताहेत. सगळीकडे बंदोबस्त वाढवून राज्यात दरारा वाढवायला हवा. खरोखरच मी हे सगळं करीन. सध्या हातात सत्ता नाही म्हणून आम्ही हळहळत असतो.

त्याचं बोलणं राजपुत्राच्या वर्मी लागत होतं. दोघांनाही

मनापासून शशिधरचं बोलणं पटलं. राजपुत्रानं तिथल्यातिथं त्याला हजार मोहरा बक्षिस दिल्या आणि तूर्त वेषांतर करण्याचा बेत रद्द केला.

दुसऱ्या दिवसापासून दोघांनीही हळूहळू वडिलांना सांगून, वेळेला त्यांचा राग ओढवून घेऊन, पण राज्यकारभारात लक्ष घालायला सुरुवात केली. राजानेही विचार केला की प्रकाश हुशार आहे, योग्य वयाचा आहे, त्याने त्याला सर्वाधिकार दिले.

आणि खरोखरच प्रकाश नि श्रीकांत यांनी अविश्रांत मेहनत करून राज्यात अनंत सुधारणा केल्या. आता त्यांना स्वकर्तव्यपालन करताकरता दिवसाचे तास पुरत नव्हते.

त्यांच्यात आणि त्यांच्यामुळे राज्यात घडलेला बदल पाहून शशीधरलाही खूप आनंद झाला.

मुलांनो, प्रत्येकानं स्वतःच्या असेल त्या परिस्थितीत कर्तव्यपालन करून आनंद मिळवायला शिकायला हवं.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
वाङ्मय विभाग
क्र. ८०९ दिनांक
विषय बा. वा. क्र.

BVBK-0400471